पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३
सुविचार - अडचणींचा सामना करणे हे यशाचे प्रवेशद्वार आहे.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

| सेन्सेक्स | ७४,३४६.१७ | -३०३.६७ - ०.४१% |
|---|---|---|
| डॉलर | ₹ ९५.३७ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३८ | २७ |
| दिल्ली | ३८ | २९ |
| मुंबई | ३३ | ३० |
| नागपूर | ३८ | २८ |
| पुणे | ३५ | २४ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरुवार, दि. ४ जून २०२६ | वर्ष २ रे | अंक २०३ किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-५:४६ संध्या-७:०७

सोने – चांदी

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५४,१००/- | २,५५,०००/- |

Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

# अमेरिकेचा इराणवर मोठा हल्ला

## तणाव पुन्हा चिघळला; तेल पुरवठ्यावर परिणाम; लष्करी कारवायांचे दावे-प्रतिदावे

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**मध्यपूर्वेत अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव पुन्हा एकदा तीव्र झाला असून दोन्ही देशांकडून परस्पर लष्करी कारवायांचे दावे-प्रतिदावे करण्यात येत आहेत. या घडामोडींमुळे जागतिक ऊर्जा बाजारात अस्थिरता निर्माण झाली आहे.**




मिळालेल्या माहितीनुसार, इराणकडून काही अमेरिकन लष्करी तळांच्या दिशेने ड्रोन आणि क्षेपणास्त्र डागण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, अमेरिका आणि सहयोगी देशांच्या हवाई संरक्षण यंत्रणांनी बहुतांश हल्ले हवेतच निष्फळ ठरवल्याचे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, अमेरिकेकडूनही इराणमधील काही धोरणात्मक ठिकाणांवर प्रत्युत्तरात्मक कारवाई करण्यात आल्याचे वृत्त आहे. विशेषतः केशम बेट परिसरात लक्ष्यांवर हवाई हल्ले झाल्याचा दावा केला जात आहे. मात्र या कारवायांचे नेमके परिणाम किती झाले याबाबत स्वतंत्र पुष्टी नाही.

इराणच्या लष्करी प्रवक्त्यांनी माध्यमांशी बोलताना अमेरिका आणि तिच्या सहयोगी देशांना इशारा देत, कोणत्याही आक्रमक कारवाईला कठोर प्रत्युत्तर दिले जाईल असे म्हटले आहे. तसेच काही अमेरिकन लष्करी तळांवर यशस्वी हल्ले केल्याचा इराणचा दावा आहे, मात्र अमेरिकेने सर्व दावे फेटाळले आहेत.

अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने स्पष्ट केले की, इराणकडून करण्यात आलेले बहुतेक हल्ले निष्फळ ठरले असून ते लक्ष्यापर्यंत पोहोचू शकले नाहीत किंवा हवाई संरक्षण प्रणालीने त्यांना रोखले.या तणावाच्या पार्श्वभूमीवर होर्मुज सामुद्रधुनीतील वाहतूक आणि तेलपुरवठा मोठ्या प्रमाणावर प्रभावित झाला आहे.

### इराणचा कुवेत-बहरीनवर मोठा हल्ला

अमेरिकेच्या सेंट्रल कमांडच्या माहितीनुसार, इराणने कुवेत आणि बहरीनच्या दिशेने क्षेपणास्त्र तसेच ड्रोन हल्ले केले. मात्र, बहुतांश क्षेपणास्त्रे लक्ष्यापर्यंत पोहोचण्यापूर्वीच निकामी झाली किंवा अमेरिका, बहरीन आणि कुवेतच्या हवाई संरक्षण यंत्रणांनी ती हवेतच पाडली. त्यामुळे कोणतेही मोठे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. अमेरिकेच्या सेंट्रल कमांड ने म्हटले आहे की, कुवेतकडे डागण्यात आलेली दोन क्षेपणास्त्रे लक्ष्यापर्यंत पोहोचली नाहीत, तर बहरीनच्या दिशेने सोडण्यात आलेली तीन क्षेपणास्त्रे संयुक्त हवाई संरक्षण प्रणालीने रोखली. अमेरिकन सैन्याने अनेक ड्रोनही हवेतच नष्ट केल्याचा दावा केला आहे.

जागतिक तेल बाजारात अस्थिरता निर्माण झाली असून अनेक देशांच्या ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होत आहे.

# सरकारची कर्जमाफी योजना केवळ धूळफेक

## काँग्रेसचे हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप

वृत्तसंस्था । मुंबई



**महायुती सरकारच्या कृषी कर्जमाफी योजनेतील पात्रता अटींमुळे राज्यातील निम्म्याहून अधिक शेतकरी या योजनेतून वगळले जाण्याची शक्यता आहे, असा आरोप महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुधवारी केला.**

त्यांनी ही योजना केवळ धूळफेक असल्याचे म्हटले. कठोर अटी लादून, मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना या योजनेच्या कक्षेबाहेर ठेवणे हेच महायुती सरकारचे उद्दिष्ट असल्याचा आरोप त्यांनी केला.

सपकाळ म्हणाले, सरकारने सर्व शेतकऱ्यांचे संपूर्ण थकीत कर्ज माफ करावे आणि प्रत्येक शेतकऱ्याचा ७/१२ उतारा कोरा करावा. या योजनेचा लाभ केवळ अशाच शेतकऱ्यांना मिळेल, ज्यांचे पीक कर्ज १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित करण्यात आले होते.

ज्या शेतकऱ्यांनी या निर्धारित कालावधीपूर्वी कर्जे घेतली होती आणि ज्यांचे जुने कर्ज थकीत असल्यामुळे त्यांना नवीन पीक कर्ज मिळवणे शक्य होत नाहीये, असे शेतकरी या योजनेतून वंचित राहतील, असा आरोप त्यांनी केला.

या कर्जमाफी योजनेचा लाभ मिळण्याची अपेक्षा असलेल्या शेतकऱ्यांच्या संख्येपेक्षा, या योजनेतून वगळल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दुप्पटीहून अधिक आहे. त्यामुळे थकीत कर्जे असलेल्या सर्व शेतकऱ्यांचा या योजनेत समावेश करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. त्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या महात्मा जोतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती (पान २ वर)

## थोडक्यात

### गुटखा, पानमसाला विक्रेत्यांना तुकाराम मुंढेचा दणका

**मुंबई ।** अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांविरोधात जोरदार मोहीम हाती घेतली आहे. राज्यामध्ये २५ ते ३१ मे या कालावधीत २०३ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. यामध्ये प्रतिबंधित अन्न पदार्थांची विक्री करणाऱ्या १३० आस्थापनांची तपासणी करून ८६ आस्थापनांना टाळे (सील) ठोकण्यात आले. तसेच १०२ जणांना अटक करण्यात आली. खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्या ७३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. या कारवाईमध्ये राज्यभरातून १ कोटी ५८ लाख २८ हजार ६७७ रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

### टीम इंडियाला मोठा धक्का!

**मुंबई ।** आयपीएल झाल्यानंतर पहिल्यांदाच भारतीय संघ आंतरराष्ट्रीय सामना खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. भारतीय आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये एकमात्र कसोटी सामन्याचा थरार रंगणार आहे. हा सामना न्यू चंदीगडमध्ये खेळवला जाणार आहे. बीसीसीआयकडून या सामन्यासाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. पण या सामन्याआधी भारतीय संघासाठी टेन्शन वाढवणारी बातमी समोर आली आहे. वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज अजूनही पूर्णपणे फिट होऊ शकलेला नाही. त्यामुळे तो या सामन्यातून बाहेर होण्याची शक्यता आहे.

### घरफोडीतील तीन आरोपींना नागपुरातून अटक


**जळगाव ।** जिल्हा पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या १२ तासांत घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणत तीन आरोपींना नागपुरातून अटक केली. आरोपींकडून चोरीस गेलेले सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम असा सुमारे १६ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यात १ जून रोजी घरफोडीची तक्रार दाखल करण्यात आली होती. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरेंनी स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक राहुल गायकवाड यांना सूचना दिल्या.

# अयातुल्ला खामेनींच्या पार्थिवावर होणार अंत्यसंस्कार

वृत्तसंस्था । तेहरान

**अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या संयुक्त हल्ल्याच्या पहिल्याच दिवशी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी केलेल्या या हल्ल्यात खामेनी यांच्यासह त्यांचे कुटुंबीय आणि इतरही बड्या अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला. पण, अयातुल्ला यांच्या मृत्यूनंतर आजवर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले नव्हते, अखेर चार महिन्यांच्या कालावधीनंतर खामेनींचे पार्थीव इराणच्या मशहद शहरातील इमाम रझा यांच्या दर्ग्याजवळ दफन केले जाईल. खामेनींच्या अंत्यविधीला अभूतपूर्व गर्दी होण्याची शक्यता आयआरजीसीने व्यक्त केली आहे.**

इराणचे सर्वोच्च अयातुल्ला अली खामेनी एका सुरक्षित बंकरमध्ये गुप्त बैठक घेत असताना अमेरिका-इस्रायलने केलेल्या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, आता खामेनींचा अंत्यविधी होणार असून, यासाठी सुमारे दोन कोटी नागरिक हजेरी लावण्याची शक्यता आहे. देशाच्या विविध ठिकाणांवरुन नागरिक या तीन दिवसीय अंत्यविधीत सहभाग घेतील. हत्येनंतर खामेनी



यांचा मृतदेह कुठं ठेवण्यात आलाय? याची काहीच माहिती समोर आली नव्हती. अखेर चार महिन्यांनंतर इराणी प्रशासन खामेनी यांच्यावर अंत्यसंस्कार करणार आहे.

समोर आलेल्या अधिकच्या माहितीनुसार, खामेनी यांच्या अंत्यविधीचा कार्यक्रम तीन दिवस चालण्याची शक्यता आहे. अंत्ययात्रा संपन्न झाल्यानंतर मशहद शहरातील इमाम रझा यांच्या दर्ग्याजवळ खामेनी यांचा दफनविधी पार पडेल. धार्मिक महत्व असणाऱ्या कोम आणि मशहद शहरातून खामेनींची अंत्ययात्रा काढली जाणार आहे, अशी माहिती आयआरजीसीने दिली आहे. इराणचे संस्थापक अयातुल्ला रुहोल्ला खामेनी यांच्या अंत्यविधीसाठी १९८९ मध्ये मोठी गर्दी पाहायला मिळाली होती. पण, या अंत्यविधीला गर्दीचा पूर्वीचा विक्रम मोडीत निघण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

# अल निनोचा प्रभाव वाढवणार जगाचं टेन्शन, हवामान संघटनेची चिंताजनक भविष्यवाणी

## कुठे दुष्काळ, अतिवृष्टी, तर कुठे महापूर, उष्णतेची लाट

वृत्तसंस्था । मुंबई

**देशभरात यंदा उष्णतेच्या लाटेने नागरिकांना हैराण केल्याचं पाहायला मिळालं. मान्सूनच्या आगमनाला विलंब झाल्याने उष्णतेने होरपळलेल्या नागरिकांना दिलासा मिळण्यास आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. मान्सूनचे आगमन लांबणीवर पडल्याने शेतकरी चिंतेत असतानाच जागतिक हवामान संघटनेकडून चिंता वाढवणारी माहिती देण्यात आली आहे.**



जगभरात वातावरण बदलामुळे मोठं संकट निर्माण झालं आहे. अल निनोच्या सक्रियतेबाबत वैज्ञानिकांकडून गंभीर इशारा देण्यात आला आहे. अल निनोचा प्रभाव वेगाने वाढण्याची शक्यता असून परिणामी मान्सून पॅटर्न बदलणार आहे. जून ते ऑगस्ट या कालावधीत अल निनोचा प्रभाव तयार होण्याची शक्यता ८० टक्क्यांपर्यंत (पान २ वर)

# मराठा आरक्षणासंदर्भात कक्ष स्थापन करणार : जलसंपदा मंत्री



प्रतिनिधी । मुंबई

**मराठा आरक्षणासंदर्भात कक्ष स्थापन करण्यात येणार असून आरक्षणासंदर्भातील नोंदी शोधणे, कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र आदीबाबत नागरिकांना सहाय्य करण्यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात येणार आहे**

तसेच प्रमाणपत्रासंदर्भात अडचणी दूर करण्यासाठी मंत्रालयातील कार्यालयात ९३२६५६२८१५ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू केला असून कार्यालयीन वेळेत या क्रमांकावर संपर्क साधता येईल, अशी माहिती जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

मराठा आरक्षण उपसमितीची बैठक मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली (पान २ वर)

# जळगावात सुट्या खाद्यतेलासह शीतपेयांचा दीड लाख रुपये किमतीचा साठा जप्त !

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई करत खुल्या स्वरूपात विक्रीस ठेवलेले खाद्यतेल तसेच मानकांनुसार नसलेल्या शीतपेयांचा एकूण १ लाख ५५ हजार ६४० रुपयांचा साठा जप्त केला आहे.**

पाचोरा आणि चाळीसगाव येथे करण्यात आलेल्या दोन स्वतंत्र कारवायांमुळे अन्न व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. आयुक्त तुकाराम मुंढे



यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईमुळे अन्न सुरक्षा नियमांची अंमलबजावणी अधिक कठोर करण्यात येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अन्न व औषध प्रशासनाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पाचोरा तालुक्यातील वरखेडी-वाघोडे परिसरात तपासणी मोहीम राबविण्यात आली. या वेळी रिफाइन्ड सोयाबीन तेल अन्न सुरक्षा मानक कायद्याच्या तरतुदींना डावलून खुल्या स्वरूपात विक्रीस ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. संबंधित व्यापाऱ्याकडे पॅकिंगविना मोठ्या प्रमाणावर तेल साठवून विक्री सुरू असल्याचे अधिकाऱ्यांना आढळले. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई करत तेलाचे नमुने विश्लेषणासाठी जप्त केले. तसेच उर्वरित ४४८ किलो खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला. या साठ्याची किंमत (पान २ वर)

### ➤ चाळीसगावातही कारवाई

चाळीसगाव येथे विनापरवाना शीतपेय विक्रेत्याची तपासणी करण्यात आली. या तपासणीत मॉन्स्टर एनर्जी आणि झिरो एनर्जी मॉन्स्टर एनर्जी अल्ट्रा या कार्बोनेटेड कॅफिनयुक्त शीतपेयांचे नमुने मानकांनुसार नसल्याचे आढळून आले. अधिकाऱ्यांनी या शीतपेयांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले असून संबंधित साठा जप्त करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान ३५० मिलीचे ४८० कॅन, ज्यांची किंमत सुमारे ६० हजार रुपये आहे. तसेच ३५० मिलीचे १२० कॅन, ज्यांची किंमत १५ हजार रुपये आहे. असा एकूण ७५ हजार रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. संबंधित शीतपेयांच्या विक्रीसाठी आवश्यक परवान्यांबाबतही अनियमितता आढळल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

## विधान परिषदेची जागा न सुटल्याने शिंदे गटाची नाराजी कायम?

# भाजपकडून मंत्री गुलाबराव पाटलांची मनधरणी

प्रतिनिधी । जळगाव

**विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात महायुतीने डॅमेज कंट्रोल करण्यास वेग दिला असून, भाजप आणि शिवसेना शिंदे गटातील नाराजी दूर करण्यासाठी हालचाली सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे. महायुतीतर्फे भाजपचे उमेदवार नंदकिशोर महाजन यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र, या महत्त्वाच्या शक्तिप्रदर्शनात पालकमंत्री तथा शिवसेना शिंदे गटाचे नेते गुलाबराव पाटील आणि त्यांचे समर्थक अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते.**

उमेदवारी अर्ज दाखल करताना महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. तरीदेखील गुलाबराव पाटील यांच्या अनुपस्थितीमुळे महायुतीत सर्व काही आलबेल नसल्याची चर्चा रंगली. जळगाव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची जागा शिवसेना शिंदे गटाला मिळावी, यासाठी पालकमंत्री



गुलाबराव पाटील यांनी शेवटपर्यंत प्रयत्न केल्याचे सांगितले जात होते. विशेषतः त्यांच्या मुलासाठी ही जागा मिळावी, अशी त्यांची इच्छा असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा होती. मात्र, अखेर ही जागा भाजपच्या वाट्याला गेल्यानंतर भाजपने नंदकिशोर महाजन यांना उमेदवारी दिली.

या पार्श्वभूमीवर, पत्रकारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना मंत्री गिरीश महाजन यांनी महायुतीत कोणतेही मतभेद नसल्याचा दावा केला. गुलाबराव पाटील हे मुंबईत महत्त्वाच्या कामानिमित्त गेले असल्याने कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीचा संबंध नाराजीशी जोडणे चुकीचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कालपर्यंत आम्ही सर्वजण एकत्र बसून निवडणुकीच्या तयारीवर चर्चा करत होतो. तासाभरापूर्वीही गुलाबराव पाटील यांच्याशी माझे बोलणे झाले असून, महायुतीमध्ये कोणतीही (पान २ वर)

# कॉक्रोच जनता पार्टीच्या ३ प्रवक्त्यांची नावे जाहीर

प्रतिनिधी । मुंबई



**सोशल मीडियावर आपल्या उपरोधिक पोस्टमुळे अवघ्या एका महिन्यात तुफान चर्चेत आलेली 'कॉक्रोच जनता पार्टी' आता राजकीय आणि सामाजिक संघटनेचे रूप घेऊ लागली आहे. संघटनेचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी बुधवारी पक्षाच्या तीन मुख्य प्रवक्त्यांची घोषणा केली आहे.**

यामध्ये देशातील नामवंत शोधपत्रकार, चित्रपट निर्माते आणि आयआयटीच्या माजी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. गेल्या काही दिवसांत या युवा 'प्रेशर ग्रुप'ने सोशल मीडियाच्या पलीकडे जात प्रत्यक्ष आंदोलनाची तयारी सुरू केल्यामुळे राजकीय वर्तुळात या नव्या संघटनेची जोरदार चर्चा रंगली आहे. पक्षाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, देशातील आघाडीचे शोधपत्रकार सौरभ दास यांच्याकडे कॉक्रोच जनता पार्टीच्या मुख्य प्रवक्तेपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. तर राजकीय (पान २ वर)

## संपादकीय

### युवा क्रांतीचा उदय शक्य !

कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके हे येत्या ६ जूनला भारतात नवी दिल्ली येथे परतत आहेत. गेले काही दिवस त्यांनी या जरा वेगळ्या नावाची पार्टी स्थापन करून जगभरात प्रसिद्धी मिळवली आहे. त्याचे दोन कोटीहून अधिक फॉलोअर्स झाले आहेत. त्याला मिळणारा प्रतिसाद हा भारतातील जेन झी क्रांतीच्या दिशेने जाताना दिसतो आहे, असे बहुतेकांचे म्हणणे आहे. अभिजीत यांनी ही पार्टी सुरू केल्यानंतर त्याची सगळी सोशल अकाउंट बंद करण्यात आली, अगदी वेबसाइटही बंद करण्यात आली. त्याचा खासगी मोबाइल नंबर सोशल मीडियावर लीक करण्याचा प्रकार घडला, त्यानंतर त्यांना या फोनवर सर्रास धमक्या यायला सुरुवात झाली. तुला अमेरिकेत येऊन मारू, अशा धमक्या रोज येत होत्या. शिवाय त्याला कधी ना कधी भारतात परत यावेच लागणार होते, त्याचे घर इथे महाराष्ट्रातच आहे, त्याच्या घराभोवती सध्या पोलीस बंदोबस्त आहे. तो जेव्हा भारतात येईल त्यावेळी त्याला विमानतळावरच अटक करून राष्ट्रद्रोहासारख्या कलमाखाली महिनोन्महिने विना सुनावणी तुरुंगात डांबले जाईल, अशी भीती सर्रास व्यक्त केली जात असताना अभिजीत यांनी सोशल मीडियावर जाहीर घोषणा करून येत्या ६ जून रोजी आपण भारतात परतत आहोत आणि विमानतळावरून आपण थेट जंतरमंतरला जाऊन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाच्या मागणीसाठी आंदोलन करणार आहोत, अशी घोषणा केली आहे. या घोषणेबरोबरच त्यांनी युवकांना विमानतळावर आणि जंतरमंतरवर पोहोचण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी देशाच्या भूमीवर ही धमाकेदार एंट्री करून सरकार पुढे आव्हानाची स्थिती निर्माण करून ठेवली आहे. आपले आंदोलन अराजक स्वरूपाचे नाही, ते पूर्णपणे शांततेने आणि घटनेच्या चौकटीतच राहील. आपल्याला अटक होईल या भीतीने भारतात परतणे आपल्याला अशक्य करून टाकले असले तरी आपण अजून सगळ्यांनी किती दिवस घाबरून जगायचं अशी विचारणा ते ठिकठिकाणीच्या व्हिडिओमध्ये देशातल्या युवा वर्गाला करताना दिसत आहेत. अभिजीत यांनी आपल्या पक्षाचा रितसर जाहीरनामाही घोषित केला आहे. त्यामध्ये एकूण पाच–सहा कलमे आहेत. त्यावर दृष्टिक्षेप टाकला तर त्यातले कुठलेही कलम वावगे किंवा थेट मोदी सरकारला आव्हान देणारे नाही. पहिली मागणी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची आहे. न्यायाधीशांना निवृत्तीनंतर राज्यसभेवर घेतले जाऊ नये, पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधीला पुढची २० वर्षे कोणतेही पद स्वीकारायला बंदी करावी, महिलांना ५०% आरक्षण लागू करावे, अशा स्वरूपाच्या त्याच्या जाहीरनाम्यातील मागण्या आहेत. यापैकी कुठलीही मागणी अवास्तव किंवा थेट भारत सरकारला आव्हान देणारी आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे हा नियोजनबद्ध कार्यक्रम घेऊन अभिजीत हे ६ जूनला दिल्लीत येत असल्याने ती एक मोठी लक्षणीय घटना ठरणार आहे. आपल्या देशाच्या आजूबाजूला बांगलादेश आणि नेपाळ सारखे जे देश आहेत तेथील युवा वर्गाने संघटितपणे व्यापक आंदोलन हाती घेऊन तिथल्या राजवटी हटवल्या. अभिजीत यांचे हे आंदोलन त्याच मार्गावरचे पहिले पाऊल मानले जात आहे. अर्थात, असे असले तरी त्यांच्या आंदोलनाला नेमके किती यश येईल हे आत्ताच सांगता येणार नाही. देशातल्या सध्याच्या स्थितीबद्दल आणि एकूणच राजकीय परिस्थितीबद्दल सामान्य जनतेच्या मनात विशेषतः युवकांच्या मनात मोठा रोष आहे हे नाकारता येणार नाही, या असंतोषाला संघटितपणे वाट करून देण्याचे काम अभिजीत या युवा नेत्याने केले आहे हे मात्र मान्य करावे लागेल. त्यामुळे अभिजीत यांनी सरकारला आव्हान देत ही जी एन्ट्री करायची ठरवली आहे त्याचा मुकाबला कसा करायचा याचे आव्हान सरकार पुढे आहे. आता ६ जून हा दिवस काही फार दूर नाही. त्यामुळे सरकार याचा मुकाबला करण्यासाठी कोणती रणनीती वापरणार हे पाहणे रंजक ठरले आहे.

# एचटीबीटी कापूस बियाण्यावरील बंदी उठवण्यासाठी आंदोलन

## १० जूनला वाका चार रस्त्यावर महाराष्ट्रात बियाणे घेवून प्रवेश करणार

प्रतिनिधी । नंदुरबार



**एचटीबीटी कापूस बियाणे कापूस हे गुजरात राज्यात विक्री केली जाते. पण महाराष्ट्रात बंदी असल्यामुळे एचटीबीटी कापूस बियाण्यावरील बंदी उठवून विक्री सुरु करावी, या मागणीसाठी किसान तंत्रज्ञान स्वातंत्र्य सत्याग्रह शेतकरी संघटनेतर्फे दि.१० जून रोजी वाका चार रस्तावर आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी संघटनेचे (शरद जोशी स्थापित) अध्यक्ष ललित पाटील बहाळे यांनी पत्रकार परिषदेत दिला.**

या पत्रकार परिषदेत शेतकरी संघटना (शरद जोशी स्थापित) चे जिल्हाप्रमुख नरेंद्र चौधरी, माजी जिल्हाप्रमुख गुलाबसिंग रघुवंशी, शहादा महेंद्र पटेल, धुळे शांतु पटेल आदी उपस्थित होते. ललित पाटील बहाळे म्हणाले की, एचटीबीटी कापूस बियाण्यांवरील निर्बंधाविरुद्ध शेतकरी संघटनेचे सविनय कायदे भंग आंदोलन किसान तंत्रज्ञान स्वातंत्र्य सत्याग्रह अधिक तीव्र करणार आहे. एचटीबीटी कापूस बियाणे शेतीतील अद्ययावत तंत्रज्ञानाचे प्रतीक आहे. जनुकिय अभियांत्रिकी स्वतंत्रपणे तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संयोगाने शेतरतील वाणांचे विविध प्रकारे मुल्य वर्धन घडवून आणण्याची क्षमता असणारे तंत्रज्ञान आहे. शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेतिल वाणिज्यरक घटक आहे. त्याला उपलब्ध अद्ययावत तंत्रज्ञान वापरण्यापासून रोखणे म्हणजे त्याच्या उपजीविकेच्या अधिकारावर गदा आणणे तसेच कापूस उत्पादनात घट, राज्याच्या जीडीपीवर परिणाम ग्रामीण रोजगारात घट, लोक सांख्यिकीय लाभांश मिळवण्यातील हा मोठा अडथळा ठरेल. शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य कृषी विभागाने कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्ये इतर राज्यांतून येणाऱ्या एचटीबीटी कापूस बियाण्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी समित्या स्थापन करण्याचा घेतलेला निर्णय राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका देणारा आहे.

महाराष्ट्रात एचटीबीटी कापसाचे एफ २ जनरेशन बियाणे आधीपासून मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आहे. सरकारच्या अशा उपद्रवामुळे शेतकऱ्यांना हे दुय्यम दर्जाचे बियाणे वापरणे भाग पडेल. हायब्रीड बियाण्याच्या बाबतीत एफ २ बियाणे पेरणी साठी, उत्पादन संदर्भात, वापरणे हे प्रतिकूल सुचक आहे. अशा परिस्थितीत बाहेरून येणाऱ्या बियाण्यांवर बंदी घालण्याचा प्रयत्न पूर्णपणे अव्यवहार्य आहे. शेतकऱ्यांना अनधिकृत मार्गाकडे ढकलेल तर उत्पादन खर्च वाढवेल आणि उत्पादनक्षमतेवर विपरीत परिणाम करेल. या निर्णयाचे गंभीर परिणाम होतील. किसान तंत्रज्ञान स्वातंत्र्य सत्याग्रह शेतकरी संघाच्या वतीने दिनांक १० जून रोजी वाका चार रस्ता नंदुरबार गुजरात मधुन एचटीबीटी कापूस बियाणे घेऊन महाराष्ट्रात प्रवेश करण्याचे सविनय कायदेभंगाचे आंदोलन केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच हा सत्याग्रह म्हणजे शेतकऱ्यांच्या तंत्रज्ञान स्वातंत्र्याची घोषणा आहे.

## आनंदवन व्यसनमुक्ती केंद्रात जनजागृती कार्यशाळा

प्रतिनिधी । नंदुरबार

**भाग्यचैतन्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार मान्यताप्राप्त आनंदवन व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र, नंदुरबार आणि नवनिर्माण सर्व समाज हितार्थ संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त तंबाखू व दारू व्यसनमुक्ती जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रमाकांत पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या सुलभा महिरे, नवनिर्माण संस्थेचे अध्यक्ष रवी गोसावी, भाग्यचैतन्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. मधुकर देसले उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांनी तंबाखूचे सेवन न करण्याची तसेच इतरांनाही त्यापासून दूर राहण्यासाठी प्रोत्साहित करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. डॉ. मधुकर देसले यांनी आनंदवन व्यसनमुक्ती केंद्राच्या विविध उपक्रमांची माहिती देत व्यसनमुक्तीच्या क्षेत्रातील कार्याचा आढावा सादर केला. नवनिर्माण संस्थेचे अध्यक्ष रवी गोसावी यांनी तंबाखूमुक्त समाज निर्मितीसाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तसेच तंबाखू सेवनामुळे होणारे गंभीर आरोग्यविषयकदुष्परिणाम कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारांचा धोका तसेच युवकांमध्ये वाढणाऱ्या व्यसनाधीनते बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. एम. एस.डब्ल्यू. विद्यार्थिनी मोदा वसावे यांनी तंबाखूमुक्त कुटुंबांच्या अनुभवांवर आधारित जनजागृती उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमादरम्यान बी.एस.डब्ल्यू. विद्यार्थिनी जानवी संजय पाटील हिने उपस्थितांना तंबाखू सेवन न करण्याची प्रतिज्ञा दिली. उपस्थितांनी तंबाखूच्या दुष्परिणामांविषयी व्यापक जनजागृती करण्याचा संकल्प केला. अध्यक्षीय भाषणात रमाकांत पाटील यांनी व्यसनमुक्तीसाठी सेवाभावी संस्था करत असलेल्या कार्याचे कौतुक केले. शासनाने गुटखा बंदी, व्यसनमुक्ती योजना व कायद्यांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रमुख पाहुण्या सुलभा महिरे यांनी समाजातील गैरसमज दूर व्यसनाधीन व्यक्तींबाबत करण्यासाठी संवेदनशील दृष्टिकोन आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी नवनिर्माण संस्थेच्या प्रकल्प व्यवस्थापक सुषमा सूर्यवंशी, कर्मचारी उज्वला कोकणी, मयुरी माळी, दिव्या शिरसाठ तसेच आनंदवन व्यसनमुक्ती केंद्राचे पदाधिकारी, कर्मचारी, एम.एस.डब्ल्यू. व बी.एस.डब्ल्यू.चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तंबाखूचे व्यसन हे केवळ व्यक्तीच्या आरोग्यालाच नव्हे तर संपूर्ण कुटुंब आणि समाजालाही घातक असून तंबाखूमुळे कर्करोग, हृदयविकार, श्वसनाचे आजार यांसारख्या गंभीर समस्या उद्भवतात. तंबाखूमुक्त समाज निमि तीसाठी नवनिर्माण सर्व समाज हितार्थ संस्था व आनंदवन व्यसनमुक्ती उपचार केंद्रामार्फत विविध जनजागृती उपक्रम, शपथविधी, रॅली, समुपदेशन व तंबाखूविरोधी अभियान सातत्याने राबविले जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नवनिर्माण संस्थेचे श्वास कोकणी दिव्या शिरसाठ उज्वला कोकणी आनंदवन व्यसनमुक्ती केंद्राचे सुभाष कोकणी, विशाल दराडे, अर्चना बागुल यांनी परिश्रम घेतले.

## विरखेल एएमआय टँकमधील गाळ काढण्यास अडथळे



प्रतिनिधी । पिंपळनेर

**विरखेल एमआय टँकमधील गाळ काढण्यास अडथळे येत असल्याने विरखेल–मंडाणे परिसरातील शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे.**

साक्री तालुक्याच्या शेवटच्या टोकाला असलेल्या विरखेल–मंडाणे परिसरातील शेतकऱ्यांसाठी जीवनवाहिनी ठरलेल्या एएमआय टँकमधून गाळ काढण्यास शासनाने मंजुरी दिली असतानाही काही व्यक्तींकडून अडथळे निर्माण केले जात असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी केला आहे.

धरणातील पाणीसाठा वाढावा, शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळावा आणि परिसरातील जलसंधारण मजबूत व्हावे, यासाठी शासनाने कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मात्र काही व्यक्ती धरणाच्या मध्यभागी आमची शेती असल्याचा दावा करत गाळ काढण्याच्या कामाला विरोध करत असल्याचे समोर आले आहे.

## डस्टबिन नसल्याने विक्रेत्यांवर मनपाची कारवाई

प्रतिनिधी । धुळे





**येथील महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरातील साक्री रोडवरील कचरा निर्माण करणारे आस्थापना, फेरीवाले व भाजी विक्रेते यांच्यावर कचरा संकलनासाठी डस्टबिन नसल्याने मनपा आरोग्य विभागामार्फत कारवाई करण्यात आली.**

ही कारवाई सहाय्यक आयुक्त डॉ. सोनाली देवरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. महापालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस यांनी शहरातील रहिवासी क्षेत्रात एक वेळी व व्यावसायिक भागात दोन वेळी कचरा संकलन करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे उपायुक्त हेमंत निकम यांनी सर्व स्वच्छता निरीक्षकांना घंटागाडी संबंधित आस्थापनाच्या वेळेवर जाण्याबाबत नियोजन करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले होते. त्यानुसार घंटागाडी दोन्ही सत्रात आस्थापनाच्या वेळेनुसार शहरात घंटागाडीद्वारे कचरा संकलन करण्यात येत आहे.

घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ नुसार शहरातील प्रत्येक नागरिकांनी व आस्थापनांनी आपला कचरा डस्टबिनमध्ये टाकावा व महापालिकेच्या घंटागाडीमध्ये देण्यात यावा अन्यथा कारवाई करण्यात येईल. सदर कारवाई मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे, लक्ष्मण पाटील, स्वच्छता निरीक्षक संदीप मोरे, विकास साळवे, संदीप वाघ मुकादम जयकिशन पीवाल यांच्या पथकाने केली.

## पान १ वरुन

**भाजपकडून मंत्री गुलाबराव......**

फूट नाही, असेही महाजन यांनी सांगितले. महायुतीतील सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकत्रितपणे काम करत असल्यामुळे आगामी निवडणुकीत महायुती अधिक मजबूत होईल, असा विश्वासही गिरीश महाजन यांनी व्यक्त केला. विरोधकांकडून मुद्दाम अफवा पसरवून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर महायुतीतील नाराजी दूर करण्यासाठी भाजपच्या उमेदवारासह नेत्यांनी पाळधी येथे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत विधान परिषद निवडणूक, महायुतीतील समन्वय आणि निवडणूक रणनीतीवर चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. या वेळी भाजपचे जळगाव पूर्व जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर, जळगाव पश्चिम जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी, जामनेर तालुका एज्युकेशन सोसायटीचे सचिव जितेंद्र पाटील, जामनेरचे उपनगराध्यक्ष डॉ. प्रशांत भोंडे, अमित देशमुख तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते. या भेटीनंतर महायुतीतील नाराजी दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याच्या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे.

**सरकारची कर्जमाफी योजना......**

योजनेअंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वी लाभ घेतला होता, त्यांना आता त्यांच्या सध्याच्या थकीत कर्जाच्या संपूर्ण माफीऐवजी केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान मिळेल. या योजनेत केवळ पीक कर्जे आणि पुनर्रचित कर्जांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विहिरी, पाइपलाइन, दुभती जनावरे आणि इतर कृषी गुंतवणुकीसाठी कर्ज घेतलेले शेतकरी या योजनेतून वगळले गेले आहेत.

**जळगावात सुट्या खाद्यतेलासह......**

८० हजार ६४० रुपये असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या प्रकरणात संबंधित उत्पादक आणि पुरवठादारांपर्यंत चौकशीचा तपास विस्तारण्यात आला असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. अन्न सुरक्षा कायद्याचे उल्लंघन करून खुल्या स्वरूपात खाद्यतेल विक्री केल्याप्रकरणी संबंधितांवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी संबंधित पुरवठादार आणि उत्पादकांविरोधात पुढील कारवाई करण्यासाठी संबंधित कार्यक्षेत्रातील अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच बाजारात वितरित करण्यात आलेला संबंधित उत्पादनांचा साठा तातडीने परत मागविण्याबाबत उत्पादक कंपनीला नोटीस बजावण्यात आली आहे.

**पावसाचा पॅटर्न बदलणार......**

असून नोव्हेंबर महिन्यापर्यंत अल नीनोचा प्रभाव पाहायला मिळू शकतो. वातावरणीय बदलामुळे अल निनोचा परिणाम अधिकच तीव्रतेने जाणवण्याची शक्यता आहे. यामुळे काही भागांमध्ये दुष्काळ, उष्णतेची लाट तर काही ठिकाणी अतिवृष्टी आणि पुराचा सामना करावा लागू शकतो. जनसामान्यांच्या जीवनावर थेट परिणाम करणारा अल निनो हा दर दोन ते सात वर्षांनी तयार होणारा वातावरणाचा पॅटर्न आहे. या स्थितीत प्रशांत महासागराचे पाणी गरम होते. ज्यामुळे जागतिक तापमानवाढ होते आणि पावसाचा पॅटर्नही बदलून जातो.

**मराठा आरक्षणासंदर्भात कक्ष......**

मंत्रालयात नुकतीच झाली. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील, आमदार प्रसाद लाड, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार सिंह, पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली–उगले, सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील, सारथीचे व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख; तसेच गृह, महसूल सामान्य प्रशासन विभागाच्या वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त, लातूर, धाराशिव आदी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

**कॉक्रोच जनता पार्टीच्या......**

विश्लेषक व चित्रपट निर्मात्या विजेता दहिया आणि आयआयटी कानपूरचे माजी विद्यार्थी आशुतोष रांका यांची प्रवक्ते म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत महाराष्ट्र देशात टॉपर

प्रतिनिधी । धुळे



**छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य करण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत दि. २९ मे रोजी देशात आतापर्यंतचे एका दिवसातील सर्वाधिक १५ हजार घरांवर प्रकल्प बसविण्यात आले असून त्यापैकी ४,७०० घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळविला.**

राज्यात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीने वेग घेतला आहे. मे महिन्यात योजनेसाठी सादर अर्जामध्ये देशात प्रथम क्रमांक, प्रकल्प बसविलेल्या एकूण घरांमध्ये दुसरा क्रमांक, प्रकल्पांच्या तपासणीमध्ये पहिला आणि पुरवठादारांच्या नोंदणीमध्ये दुसरा क्रमांक अशा रितीने या योजनेच्या बाबतीत महाराष्ट्र देशात सर्वोच्च कामगिरी करणाऱ्या पाच टॉपर राज्यांमध्ये समाविष्ट झाला आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची राज्यात महावितरणमार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे.

## तळोदा येथे अहिल्याबाई होळकर जयंती साजरी




प्रतिनिधी । तळोदा

**राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त सेवाभावे प्रतिष्ठान तळोदातर्फे प्रतिमा पूजन करीत अभिवादन केले. यावेळी राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी समाजासाठी दिलेल्या महान योगदानाचा गौरव केला.**

त्यांनी मंदिरांचे जिर्णोद्धार, विहिरी बांधणे, रस्ते निर्माण, वृक्षारोपण तसेच समाज प्रबोधनाचे कार्य करून समाजहितासाठी मोठे योगदान दिले असल्याचे मान्यवरांनी सांगितले. याप्रसंगी सेवाभावे प्रतिष्ठानचे अध्यक्ष उमेश सोनवणे, विजयसा सोनवणे, दत्तू पाटील, प्रल्हाद मिस्तरी, विजय कसबे तसेच मायकी सक्सेना आदी उपस्थित होते.

# तळोदा येथील संजय गांधी निराधार समितीची प्रकरणे रखडली

## तीन महिन्यांपासून समितीने बैठक घेतली नसल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजी

प्रतिनिधी । तळोदा

**येथील तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार समितीची बैठक गेल्या तीन महिन्यांपासून झालेली नसल्यामुळे लाभार्थ्यांची प्रकरणे रखडली आहेत. या प्रकरणी महसूल प्रशासनाने दखल घेत तातडीने बैठक प्रस्ताव मार्गी लावावेत, अशी मागणी होत आहे.**

समाजातील दारिद्र्य रेषेखालील गरीब गरजू कुटुंबांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ, श्रावण बाळ अशा वेगवेगळ्या योजना राबवित आहेत. याशिवाय या लाभार्थ्यांच्या निवडीसाठी शासनाने शासकीय, अशासकीय सदस्यांची संजय गांधी निराधार समिती स्थापन केली आहे. ही समिती लाभार्थ्यांकडून समितीकडे दाखल झालेल्या प्रस्तावातील कागदपत्रांची पडताळणी करून लाभार्थी निश्चित करत असते. तथापि सदर समितीची बैठक गेल्या तीन महिन्यांपासून झालेली नसून त्यामुळे लाभार्थ्यांची प्रकरणेही रखडली आहेत. परिणामी पात्र लाभार्थ्यांनीही शासनाच्या या योजनेपासून वंचित राहावे लागत असल्याचा लाभार्थ्यांचा आरोप आहे. वास्तविक दरमहा बैठक घेऊन दाखल प्रस्ताव मार्गी लावणे अपेक्षित असताना तब्बल तीन महिन्यांपासून बैठक घेण्यात आली नसल्यामुळे लाभार्थ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. महसूल प्रशासनाने या प्रकरणी दखल तातडीने बैठक बोलावण्याची मागणी लाभार्थ्यांनी केली आहे.

येथील महसूल विभागाची संजय गांधी निराधार योजना समितीकडे मिळालेल्या माहितीनुसार शहरासह ग्रामीण भागातील लाभार्थ्यांची २०० ते २५० प्रकरणे दाखल झाली आहेत. साहजिकच समितीनेही तातडीने बैठक घेऊन पात्र लाभार्थ्यांची कागदपत्रांची पडताळणी करून मार्गी लावावी, अशी अपेक्षा आहे. शासनाने उत्पन्नाची अट वाढवावी. समाजातील दारिद्र्य रेषेखालील गरीब गरजू कुटुंबांना उदर निर्वाहासाठी आर्थिक मदत शासनाने अतिशय चांगल्या हेतूने या योजना लागू केल्याने त्याचा फायदाही या घटकास होत आहे. मात्र, त्याचा लाभ घेताना जी उत्पन्नाची मर्यादा शासनाने घातली आहे. कारण वार्षिक एकवीस हजार रुपये उत्पन्न अन्यायकारक आहे. वास्तविक शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार मजुराचा दैनंदिन रोज २६४ रुपये शासनानेच निश्चित केला आहे. हा दर पकडला तरी त्याचे वार्षिक उत्पन्न साधारण ९० हजार रुपयांपेक्षा अधिक जाते. शिवाय तलाठी देखील एकवीस हजाराचा उत्पन्नाचा दाखला लाभार्थ्यास देताना विचार करतात. परिणामी बहुसंख्य लाभार्थी गरजू असताना प्रकरणे करण्यास पुढे येत नाही. परिणामी ते वंचित राहतात. त्यामुळे शासनाने उत्पन्नाच्या मर्यादेच्या या जाचक अटींबाबत सकारात्मक विचार करून त्यात मोठी वाढ करावी, अशी मागणी होत आहे.

> संजय गांधी निराधार योजना समितीकडे लाभार्थ्यांचे साधारण २०० पेक्षा अधिक प्रस्ताव दाखल झाले आहेत. बैठकीसाठी नियोजनही करण्यात आले असून लवकरच कार्यवाही करण्यात येईल.
>
> **जयंत भट,**
> नायब तहसीलदार, तळोदा.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

१९४१ : राष्ट्रसेवा दलाची स्थापना
१९७५ : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दुसरे सरसंघचालक मा.न. गोळवलकर गुरुजी यांचे निधन.
१९९४ : वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू ब्रायन लारा याने आठ डावात सात शतके ठोकून नवा विक्रम प्रस्थापित केला.

## थोडक्यात

### होल्डिंगधारकांनी बॅनरची तपासणी करणे आवश्यक

**जळगाव ।** सध्या सुरू असलेल्या वादळी व पावसाळी हवामानामुळे जाहिरातींचे बॅनर, फ्लेक्स व इतर साहित्य फाटून किंवा तुटून रस्त्यावर पडण्याची तसेच विद्युत वाहिन्यांवर अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे नागरिकांच्या जीवितास व मालमत्तेस धोका निर्माण होऊन अपघात व जीवितहानी होण्याची शक्यता आहे. तरी सर्व होल्डिंगधारकांनी आपल्या होल्डिंगवरील बॅनर, फ्लेक्स व जाहिरात साहित्याची तात्काळ तपासणी करून आवश्यक ती दुरुस्ती करावी. धोकादायक स्थितीत असलेले किंवा सैल झालेले बॅनर त्वरित सुरक्षित करावेत अथवा काढून टाकावेत. या सूचनेचे पालन न केल्यास तसेच त्यातून कोणतीही दुर्घटना घडल्यास संबंधित होल्डिंगधारकास जबाबदार धरून नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा मनपाचे उपायुक्तांनी दिला आहे.

### घोषवाक्य स्पर्धेतून तंबाखू मुक्तीचा संदेश



**जळगाव ।** येथील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय येथे महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जगदीशचंद्र वाथर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ०३ जून रोजी आकर्षणामागचे सत्य: निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाचा प्रतिकार या विषयावर विशेष घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तरुण पिढीला तंबाखू व निकोटीनच्या फसव्या आकर्षणापासून दूर ठेवणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेत आपल्या प्रभावी घोषवाक्यांतून तंबाखूचे दुष्परिणाम मांडले. हा संपूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी अत्यंत प्रभावी आणि प्रेरणादायी ठरला. यशस्वीतेसाठी शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# लोककल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहचवा

## नागरी विकास व लोककल्याणकारी योजनांच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्ट निर्देश

प्रतिनिधी । जळगाव



**शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून पारदर्शक कारभार करावा, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दिले.**

जिल्ह्यातील नागरी भागांत विविध केंद्र व राज्य शासन पुरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आज जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व नगरपरिषद व नगरपंचायत मुख्याधिकाऱ्यांची मासिक आढावा बैठक झाली. त्याप्रसंगी ते बोलत होते. या बैठकीस सहायक आयुक्त (नगरपालिका प्रशासन शाखा) आणि जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत शहरांच्या सुनियोजित विकासाच्या दृष्टीने खालील महत्त्वाच्या उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. स्वच्छता व पर्यावरण संवर्धन: स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंमलबजावणी, सांडपाणी प्रक्रिया केंद्र जागा मागणी आणि माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत घनकचरा, जल, वायू व अग्नी संवर्धनाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. पायाभूत सुविधा व विकास निधी: अमृत २.० योजना, आवास योजना, जिल्हा वार्षिक योजना आणि राज्य नागरोत्थान योजनेच्या निधी विनियोगाची तपासणी करण्यात आली. आपत्ती व्यवस्थापन व प्रशासन: आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेण्यात आला. तसेच शासकीय जागेवरील अतिक्रमण निर्मूलन करण्याबाबत चर्चा झाली. मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली वाढवणे, वित्त आयोग निधी खर्च आणि ICT Based Scanning च्या सद्यस्थितीची पडताळणी करण्यात आली. कर्मचारी व सामाजिक कल्याण: दिव्यांग व्यक्तींना विविध योजनांचे लाभ देणे, लाड पागे वारसा हक्क व अनुकंपा नियुक्ती प्रकरणांचा तात्काळ निपटारा करणे आणि सफाई कामगारांच्या प्रलंबित प्रकरणांवर चर्चा झाली. प्रलंबित कोर्ट केसेस आणि स्थानिक निधी परीक्षण अंतर्गत लेखापरीक्षण आक्षेपांची कायदेशीर पूर्तता करण्याचे निर्देश देण्यात आले. या सर्व विषयांच्या अनुषंगाने सर्व मुख्याधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात कालबद्ध व गतिमान कार्यवाही करीत लोककल्याणकारी योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून पारदर्शक कारभार करावा, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

### जनगणना निर्धारित मुदतीत काम पूर्ण करा

जिल्ह्यात जनगणनेचे राष्ट्रीय कर्तव्य विहित मुदतीत आणि अचूकतेने पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्व चार्ज अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली.

जिल्ह्यात आतापर्यंत पूर्ण झालेल्या जनगणना कामकाजाची सद्यस्थिती आणि प्रगतीबाबत सविस्तर पडताळणी करण्यात आली. अडचणींचे निराकरण: क्षेत्रीय स्तरावर काम करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींवर सविस्तर चर्चा करून त्यावर तात्काळ उपाययोजना निश्चित करण्यात आल्या. उर्वरित सर्व कामकाज गतीने आणि अचूकतेने पूर्ण करण्यासाठी सूक्ष्म आराखडा तयार करण्यात आला. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी, तहसीलदार यांच्यासह जिल्ह्यातील सर्व चार्ज ऑफिसर तथा तहसीलदार आणि सर्व चार्ज ऑफिसर तथा नगरपरिषद/नगरपंचायत मुख्याधिकारी उपस्थित होते. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, दि.४ जूनपर्यंत जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील संपूर्ण काम अनिवार्यपणे पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

## जुनोनेच्या नामदेव पाटील यांची पीएसआय पदावर निवड

प्रतिनिधी । धरणगाव



**तालुक्यातील जुनोने येथील सुपुत्र नामदेव देविदास पाटील यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड मिळविल्याबद्दल त्यांचा जी.एस. ग्रुपच्यावतीने सत्कार करून गौरव करण्यात आला.**

यावेळी आयोजित कार्यक्रमात नामदेव पाटील यांच्या यशस्वी वाटचालीचा गौरव करत उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या जिद्द, चिकाटी आणि परिश्रमांचे कौतुक केले. प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत, अनेक अडचणींवर मात करून त्यांनी स्पर्धा परीक्षेच्या कठीण प्रवासात यश मिळविले असून, हे यश ग्रामीण भागातील युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. जी.एस. ग्रुपचे संचालक उमेश चौधरी यांनी आपल्या मनोगतात नामदेव पाटील यांनी केलेल्या संघर्षमय परिस्थितीचा लेखाजोखा मांडला. याप्रसंगी नामदेव पाटील यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी त्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, कुटुंबीय, शिक्षक तसेच मित्रपरिवार यांच्या पाठिंब्याला दिले. सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि कठोर मेहनतीच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, असा संदेश त्यांनी युवकांना दिला. कार्यक्रमास जी.एस. ग्रुपचे गणेश माळी, प्रफुल्ल लोहार, सोपान महाजन यांच्यासह अनेक मान्यवर व युवक उपस्थित होते.

## खैरकुंडी आदिवासी दुर्गम भागात आरोग्य शिबीर

प्रतिनिधी । चोपडा



**जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन भायेकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गिरीश गोसावी, वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहन मराठे व डॉ.सुनील बारेला यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २ मे रोजी प्रा.आ.केंद्र वैजापूर अंतर्गत उपकेंद्र देवझिरी येथील अतिदुर्गम अशा खैरकुंडी पाड्यात विविध प्रकारच्या आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.**

त्यात सर्वात महत्वाचे म्हणजे मान्सूनपूर्व कार्यक्रमांतर्गत कीटकजन्य आजाराविषयी सर्वेक्षण, सर्व गरोदर मातांची तसेच सर्व लहान बालकांची तपासणी डॉ.सुनील बारेला यांनी केली. एन सी डी कॅम्प घेण्यात आला. पाणी पुरवठा स्रोत तपासणी, तसेच माझं गाव आरोग्य संपन्न गाव, ग्राम आरोग्य पोषण दिवससंदर्भात सर्व किरकोळ आजारी रुग्णांवर उपचार केले. लसीकरण सत्रात ५ गरोदर मातांच्या रक्तदाब, रक्तातील साखर, हिमोग्लोबीन चाचण्या करून त्यांना धनुर्वात, घटसर्प आदी लस देण्यात आली. लहान बालकांना वयोगटाप्रमाणे लसीकरण करण्यात आले. एनसीडी कॅम्पमध्ये एकूण ५२ लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील बारेला यांनी गरोदर मातांना माहेरघर योजनेबद्दल सविस्तर माहितीयुक्त मार्गदर्शन केले. त्या अनुषंगाने आरोग्य केंद्रात अगोदर भरती होण्यासाठी सल्ला दिला. समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.आनंद राठोड यांनी पावसाळ्यात उकळून गार केलेले पाणी पिण्याच्या सूचना दिल्यात व त्यांचे हस्ते लाभार्थ्यांना ओआरएस पाकिटांचे वाटप करण्यात आले. शिबिर यशस्वितेसाठी जपायगो टीमचे सदस्य ज्ञानेश्वर पाटील, आरोग्य सहाय्यक प्रशांत बोरसे, आरोग्यसेविका निशा डोंगरे, गट प्रवर्तक अंजना कोळी, आशा सेविका छमी बारेला आदी उपस्थित होते.

## सा.बां. विभागातील कथित भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करा : मनसे

प्रतिनिधी । जळगाव



**जळगाव सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये कथित भ्रष्टाचार, लाचखोरी, नातेसंबंधातून शासकीय कंत्राटांचे वाटप आणि बेरोजगार युवकांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे.**

मनसेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर केले. या निवेदनात सार्वजनिक बांधकाम विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमतातून भ्रष्टाचार वाढीस लागल्याचा आरोप करण्यात आला आहे. विभागातील कामकाजात पारदर्शकतेचा अभाव असून, शासकीय कंत्राटे देताना नियमांचे उल्लंघन होत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाल्याचे मनसेने म्हटले आहे. नुकत्याच समोर आलेल्या लाचखोरी प्रकरणाचा संदर्भ देत मनसेने केवळ एका अधिकाऱ्यावर कारवाई करून प्रकरण संपवू नये, तर त्यामागील संपूर्ण साखळीचा शोध घेऊन संबंधित अधिकारी, मध्यस्थ, कंत्राटदार आणि लाभार्थी यांची सखोल चौकशी करावी, या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा बेरोजगार युवकांच्या न्याय्य हक्कांसाठी मनसे तीव्र जनआंदोलन छेडेल, असा इशारा मनसेने दिला आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष ॲड. जमील देशपांडे, विनोद शिंदे, श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, राजेंद्र निकम, प्रकाश जोशी, प्रदीप पाटील, पंकज चौधरी, भूषण ठाकूर, बादशहा शहा, अमजद खाटीक यांच्यासह महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान पथकाकडून पाहणी

प्रतिनिधी । जळगाव

**राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना दरम्यान राबविण्यात आलेले विविध उपक्रम व झालेल्या कामांच्या मुल्यमापनासाठी छत्रपती संभाजी नगर येथील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी एम यांच्या अध्यक्षतेखालील पथक जळगाव जिल्ह्यात दाखल झाले असून दि २ जून रोजी या पथकाने जिल्ह्यातील पाचोरा व चाळीसगाव तालुक्यातील गावांना भेटी देऊन पाहणी केली.**

ग्रामीण भागात पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात व गावांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी गेल्या वर्षभरापासून राज्यशासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानात राबविण्यात आलेले विविध उपक्रम व करण्यात आलेल्या कामांची पाहणी करण्यासाठी जळगाव जिल्ह्यात संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी एम यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी यांचे पथक दाखल झाले आहे. मंगळवारी या पथकाने जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील उंबरखेड व बोरखेडा येथे भेट देऊन पाहणी केली. तसेच पाचोरा तालुक्यातील वडगाव कडे आसनखेड बु. येथे भेट देऊन पाहणी केली. हे पथक चार दिवस जिल्ह्यात मूल्यमापन करणार आहे.

## रेल घटनेतील सांगाडा तपासणीसाठी धुळ्याला रवाना

प्रतिनिधी । धरणगाव

**तालुक्यातील रेल येथील १२ वर्षीय गणेश पाटील संशयास्पद मृत्यूप्रकरणी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून, अडीच महिन्यांपूर्वी दफन केलेला मृतदेह न्यायालयाच्या परवानगीनंतर बाहेर काढण्यात आला. पुढील तपासासाठी सांगाडा फॉरेन्सिक तपासणीसाठी धुळे येथे पाठविण्यात आला आहे.**

गणेश पाटील हा रेल येथील परिसरातील क्रिकेटप्रेमी मुलगा होता. मोकळ्या मैदानावर सायंकाळी सुरू असलेल्या क्रिकेट सामन्यादरम्यान तो अचानक खाली पडल्याची घटना घडली होती. त्यानंतर त्याला तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला होता. घटनेनंतर कुटुंबीयांनी मृत्यूबाबत संशय व्यक्त केला होता. काही ग्रामस्थांनी हा मृत्यू नैसर्गिक नसून घातपातामुळे झाला असावा, असा संशय व्यक्त केला. त्यानंतर मुलाचे वडील नवल पाटील यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल करून सखोल चौकशीची मागणी केली होती.

## एआयच्या प्रभावी वापराने कृषी क्षेत्रात परिवर्तन : अनिल जैन

### यवतमाळ, गुजरातच्या आनंद निकेतन शाळेला पहिले पारितोषिक

प्रतिनिधी । जळगाव




**कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजेंस) जगभरात वेगाने बदल घडवत असली तरी कृषी आणि अन्नव्यवस्था हे क्षेत्र भविष्यातही तितकेच महत्त्वाचे राहणार असून एआयच्या प्रभावी वापराने कृषी क्षेत्रात परिवर्तन घडेल, असे प्रतिपादन फालीचे चेअरमन तथा जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष अनिल जैन यांनी केले.**

जळगावातील जैन हिल्स येथे सुरू असलेल्या फाली संमेलनाच्या १२ व्या वर्षाच्या पहिल्या टप्प्यातील पारितोषिक वितरणाप्रसंगी ते बोलत होते. यामध्ये कृषी उद्योगातील बिझनेस प्लॅन सादरीकरण विभागात यवतमाळमधील पीएम रुईकर ट्रस्ट, हायस्कूल, नांझा शाळेच्या संघाला पहिले पारितोषिक मिळाले.तर कृषी इन्व्होशन सादरीकरणात अहमदाबादमधील आनंद निकेतन सॅटेलाइट कॅम्पस या शाळेच्या संघाने प्रथम पारितोषिक पटकावले. अनिल जैन यांनी कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरावर भर देण्याचा सल्ला दिला. शिक्षणासोबतच नेतृत्त्वासाठी आवश्यक कौशल्ये आणि दृष्टी विद्यार्थ्यांना देणे हे फालीचे उद्दिष्ट असून, येत्या काही वर्षांत १० लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे ध्येय आहे. भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याच्या प्रवासात कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत निर्णायक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. गेल्या बारा वर्षांपासून फाली उपक्रम विद्यार्थ्यांना शिक्षण, मार्गदर्शन आणि प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देत आहे. जैन इरिगेशनचे संस्थापक भवरलाल जैन यांच्या प्रेरणादायी कार्याचा उल्लेख करत अनिल जैन यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचे आवाहन केले. नवनियुक्त सीईओ शाबोर्नी पोद्दार यांनी पदभार स्वीकारला. तसेच फालीच्या संस्थापिका तथा उपाध्यक्षा नॅन्सी बॅरी यांनी ही संवाद साधला. कृषी इन्व्होशन सादरीकरण - प्रथम क्रमांक आनंद निकेतन सॅटेलाइट कॅम्पस, अहमदाबाद, दुसरा क्रमांक- न्यू इंग्लीश स्कूल, भालोद, जळगाव, तिसरा क्रमांक- श्री सातपुडा विद्यालय, लोणखेडा, नंदुरबार, चौथा क्रमांक- श्री यमाई श्रीनिवास विद्यालय, औंध, सातारा, पाचवा क्रमांक- न्यू इंग्लिश गर्ल्स स्कूल, आष्टा, सांगली यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

# शहरात ४ किलोमीटरचा ‘ग्रीन कॉरिडोर’ साकारणार

**• महानगरपालिका, अहमदाबादच्या अखिल भारतीय आपत्ती व्यवस्थापनतर्फे आज उपक्रम; जळगाव शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा**

प्रतिनिधी । जळगाव




**जळगाव शहराच्या निसर्गरम्य विकासासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी एक अत्यंत महत्त्वाकांक्षी पाऊल उचलण्यात आले आहे. जळगाव शहर महानगरपालिका पर्यावरण विभाग व अखिल भारतीय आपत्ती व्यवस्थापनच्या संयुक्त विद्यमाने शहरात ४ किलोमीटर लांबीचा ‘ग्रीन कॉरिडोर’ (हरित मार्ग) प्रकल्प साकारण्यात येत आहे.**

या बहुप्रतिक्षित प्रकल्पाच्या कामावेळी दि.४ जून रोजी सायंकाळी ४ वाजता निमखेडी शिवारातील चंदू अण्णा चौक येथे संपन्न होणार आहे. या उपक्रमांतर्गत लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि जळगावच्या नागरिकांच्या हस्ते सामूहिक वृक्षारोपण केले जाणार आहे. शहरातील एकूण ४ किलोमीटरच्या दोन प्रमुख मार्गांवर हा पर्यावरणपूरक कॉरिडॉर विकसित केला जाणार आहे. मार्ग १: चंदू अण्णा चौक ते कचरा फॅक्टरी मार्ग २: निमखेडी गाव ते सुरत रेल्वे गेट असा राहील. या कार्यक्रमाला राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, खा. स्मिता वाघ, आ. राजूमामा भोळे, महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, मनपा स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील आणि प्रभाग ९ च्या नगरसेविका जयश्री पाटील व प्रतिभा देशमुख आदी उपस्थित राहणार आहेत.

सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी समाधान सोनवणे, जळगाव मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, अतिरिक्त आयुक्त शोभा बाविस्कर, उपायुक्त पंकज गोसावी, उपायुक्त धनश्री शिंदे, गायत्री महाले हे देखील उपस्थित राहतील.

जळगाव शहराचा पर्यावरण समतोल राखण्यासाठी आणि शहराला हिरवेगार रूप देण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. जळगाव शहरात निमखेडी भागात पश्चिमेकडून येणारे वारे आहेत. या ग्रीन कॉरिडोरमुळे शहर थंड राहण्यास मदत होणार असून यामुळे जळगावला तापमानवाढ कमी होण्यास मदत होणार आहे. या वृक्षारोपण कार्यक्रमाला जळगावकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपले योगदान द्यावे, असे आवाहन महापौर दीपमाला काळे यांनी केले आहे.

## लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांना मेहरूण येथे अभिवादन

प्रतिनिधी । जळगाव

**लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त समस्त लाड वंजारी समाज, श्रीराम मंदिर संस्थान मेहरूण व वंजारी युवा संघटना, जळगाव जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. गोपीनाथराव मुंडे चौक येथे अभिवादन कार्यक्रम पार पडला.**

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. मुंडे साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. आपल्या मनोगतात वक्त्यांनी मुंडे साहेबांचे सामाजिक, राजकीय तसेच सर्वसामान्य जनतेसाठीचे कार्य अधोरेखित केले. जनतेच्या सुख-दुःखात सदैव सहभागी राहून त्यांनी केलेले नेतृत्व व समाजहिताचे कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी नामदेव वंजारी, प्रशांत नाईक, रामेश्वर पाटील, संतोष घुगे, अनिल घुगे, महादू सोनवणे, उमेश आंधळे, सुधीर नाईक, सुनील वंजारी, किशोर वाघ, अशोक लाडवंजारी, राजेंद्र घुगे पाटील, सोमनाथ पाटील, दिलीप लाडवंजारी, रमेश लाडवंजारी, अनिल चाटे, शिवाजी आंधळे, गणेश वाघ, प्रकाश घुगे, रवींद्र सानप, सुभाष घुगे, महेश घुगे, नंदू वंजारी, सुनील घुगे, गजानन झेड. पाटील, संजय घुगे, किशोर ढाकणे, दत्तात्रेय लाड, संजय देविदास पाटील उपस्थित होते.

# चोपडा नगरपरिषदेचा अतिक्रमणावर बुलडोझर

## • व्यापारी, दुकानदारांची सामंजस्याची भूमिका; पोलिस-आरसीपी जवानांचा चोख बंदोबस्त

प्रतिनिधी । चोपडा

**येथील नगरपरिषदेने शहरातील वाढत्या अतिक्रमणांवर प्रभावी कारवाई करत बुधवारी व्यापक अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबवली. विशेष म्हणजे, या मोहिमेपूर्वी सलग तीन ते चार दिवस रिक्षाद्वारे शहरभर जनजागृती व आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत अनेक नागरिक व व्यावसायिकांनी अतिक्रमण हटाव पथक येण्यापूर्वीच स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून घेतल्याचे चित्र शहरात पाहायला मिळाले.**





### मुख्याधिकाऱ्यांचे आवाहन

चोपडा शहर अधिक सुंदर, स्वच्छ, सुटसुटीत व वाहतुकीसाठी सुरक्षित व्हावे, ही नगरपरिषदेची भूमिका आहे. रस्ते व गटारींवरील अतिक्रमणे केवळ वाहतुकीस अडथळा निर्माण करत नाहीत, तर गटारींमध्ये घाण साचण्यास कारणीभूत ठरून आरोग्याच्या समस्याही वाढवतात. त्यामुळे सर्व अतिक्रमणधारकांनी कोणतीही कारवाई होण्याची वाट न पाहता संपूर्ण शहरात स्वयंस्फूर्तीने अतिक्रमणे काढून नगरपरिषदेला सहकार्य करावे, असे मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी अतिक्रमणधारकांना सांगितले.

मोहिमेची सुरुवात संविधान चौक येथून करण्यात आली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाटील दरवाजा, आठवडे बाजार शॉपिंग कॉम्प्लेक्स परिसर, भाजीपाला मार्केट, आझाद चौक, बोहरा गल्ली, मुख्य बाजारपेठ, चावडी, गोल मंदिर परिसर आदी भागांमध्ये अतिक्रमण हटावची कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान रस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आलेल्या टपऱ्या, ओटे व इतर अडथळे हटविण्यात आले. एकूण ५०० लहान-मोठी अतिक्रमणे व ओटे काढून शहरातील रस्ते मोकळे करण्यात आले.

काही ठिकाणी अतिक्रमणधारकांनी गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला असला तरी नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी संयमाची भूमिका घेत संबंधितांना समजावून सांगितले. काही व्यावसायिकांनी आपले साहित्य हलविण्यासाठी दोन ते तीन तासांची मुदत मागितली. त्यांचे आर्थिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने नगरपरिषद प्रशासनाने मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारत त्यांना आवश्यक मुदत दिली. भाजीपाला विक्रेते, चिकन-मटन विक्रेते तसेच मासे विक्रेते यांना वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार भाजीपाला विक्रेत्यांनी भाजी मंडईमध्ये, चिकन-मटन विक्रेत्यांनी मटन मार्केटमध्ये तर मासे विक्रेत्यांनी त्यांच्यासाठी नगरपरिषदेकडून निश्चित करून दिलेल्या जागांवरच व्यवसाय करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

मोहीम पूर्ण झाल्यानंतर शहरातील प्रमुख रस्ते अधिक मोकळे व प्रशस्त झाल्याचे दिसून आले. अनेक नागरिकांनी रस्त्यांनी पुन्हा श्वास घेतला, अशी प्रतिक्रिया व्यक्त करत नगरपरिषदेच्या कारवाईचे स्वागत केले.

शहरातील विविध भागांतील नागरिकांनी मुख्याधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष भेटून तसेच दूरध्वनीद्वारे संपर्क साधून इतर गल्ली-बोळांमधील अतिक्रमणेही टप्प्याटप्प्याने हटविण्याची मागणी केली.

शहरातील एक ज्येष्ठ नागरिक म्हणाले, अनेक वर्षांपासून रस्त्यांवर अतिक्रमण वाढल्याने नागरिकांना व वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. नगरपरिषदेने धाडसी व लोकहिताचा निर्णय घेत कारवाई केल्यामुळे आता रस्ते मोकळे दिसत आहेत. ही मोहीम नियमित सुरू राहावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

---

## थोडक्यात


### जळगावात भ्रष्टाचाराचा नवा रस्ता; १२ तासांतच उखडला

**जळगाव ।** पिंप्राळा बजरंग बोगदा ते भोईटे नगर दरम्यान नव्याने करण्यात आलेल्या डांबरीकरणाचे काम अवघ्या १२ तासांत उखडल्याने खळबळ उडाली आहे. कंत्राटदाराने कोणतीही साफसफाई न करता थेट मातीवर डांबर टाकून निकृष्ट दर्जाचे काम केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सामाजिक कार्यकर्ते दीपक गुप्ता यांनी रस्त्यावरील डांबर हाताने उखडून दाखवत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, उपमहापौर मनोज चौधरी यांनी घटनास्थळी भेट देत संबंधित अधिकाऱ्यांना व कंत्राटदाराला जाब विचारला असून प्रकरणाच्या चौकशीची मागणी केली आहे. दरम्यान, रस्त्यांच्या निकृष्टपणावर केवळ नागरिकांची ओरड असून यावर लवकरात लवकर उपाययोजना करणे गरजेचे असल्याचा सूर आता शहरवासीयांचा निघत आहे. अन्यथा नागरिकांच्या भावना तीव्र झाल्या आहेत.

## घोडगावचे संजय पाटील ग.स.सोसायटीतून सेवानिवृत्त

प्रतिनिधी । चोपडा

**जळगाव जिल्हा सरकारी नोकराची सहकारी पतपेढी अर्थात ग.स सोसायटी जळगाव शाखा, चोपडा येथील घोडगांव येथील रहिवासी माजी सरपंच तथा चोपडा सूतगिरणीचे संचालक संजय उत्तमराव पाटील हे शाखाधिकारी या पदावरून ३१ मे २०२६ रोजी ३७ वर्षे सेवेतून सेवानिवृत्त झाले.**



त्याच्या सेवापूर्तीचा कार्यक्रम हा नुकताच ग. स. सोसायटीच्या चोपडा शाखेत करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार तथा सूतगिरणीचे चेअरमन कैलास पाटील उपस्थित होते. यावेळी संजय पाटील यांना शाल, श्रीफळ भेटावस्तू देत स्वपत्नीक सत्कार केला. यावेळी चोपडा सूतगिरणीचे व्हाईस चेअरमन प्रल्हाद पाटील, सहकार गटाचे श्रेष्ठी तथा माजी संचालक रमेश शिंदे, जळगाव माध्यमिक शिक्षक संघटनाचे श्रेष्ठी आर.एच बाविस्कर, ग.स सोसायटीचे माजी अध्यक्ष तथा संचालक सुनिल सूर्यवंशी, संचालक मंगेश भोईटे, योगेश सनेर, तज्ञ संचालक एकनाथ पाटील, सूतगिरणी संचालक चंद्रकांत पाटील, प्रकाश रजाळे, रमाकांत बोरसे, शेतकी संघांचे माजी चेअरमन प्रल्हाद पाटील, कृउबाचे माजी सभापती कांतीलाल पाटील, घोडगाव येथील युवराज महाराज, प्रा. विजयकांत पाटील, जितेंद्र पाटील, नाना ठाकरे, विजय रजाळे, विपुल बाविस्कर, सागर पाटील, चंद्रकांत सोनवणे, आनंदराव बोरसे विभागीय अधिकारी दिलीप सपकाळे, शाखाधिकारी शितल मोरे, स्मिता मोरे, शरद पाटील, जगन्नाथ बाविस्कर, उपशाखाधिकारी मीना तडवी, किरण सोनवणे, तुषार सूर्यवंशी, जितेंद्र सूर्यवंशी, स्वप्निल सोनवणे, निलेश साळुंखे, अनिता पाटील, अनिल बाविस्कर, सुरेश पाटील यासह सोसायटीचे कर्मचारी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी स्वप्निल पाटील, उज्ज्वल शिंदे, योगेश बाविस्कर, ललित पाटील, राहुल गोड, पियुष पाटील यासह कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार विजयानंद शिंदे यांनी केले.

## केळी उत्पादकांचे मोठे नुकसान

### तातडीने पंचनामे करून मदतीची मागणी



प्रतिनिधी । रावेर

**तालुक्यात झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे रावेर तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले असून अनेक एकरांवरील केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या आहेत.**

या पार्श्वभूमीवर आज रावेर तालुक्यातील मोरगाव, तामसवाडी, खिर्डी, नेहते, अहिरवाडी तसेच परिसरातील इतर गावांच्या शिवारांना भेट देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची पाहणी करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना अनेकांनी नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीबाबत चिंता व्यक्त केली. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. यासंदर्भात महसूल प्रशासनाशी समन्वय साधून तात्काळ पंचनामे करण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. वादळामुळे अनेक ठिकाणी खंडित झालेला वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून दुरुस्तीची मागणी करण्यात आली. आधीच वाढती इंधन दरवाढ, विजेच्या उपलब्धतेतील अडचणी, खतांच्या वाढत्या किंमती आणि शेती उत्पादन खर्चामुळे शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. शेतकऱ्यांचा आवाज शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी ठामपणे लढा दिला जाईल, असे यावेळी सांगण्यात आले. या पाहणी दौऱ्यात डॉ.राजेंद्र पाटील, सुनील कोंडे, भूपेश जाधव, योगेश पाटील, नीलकंठ चौधरी, निलेश चौधरी, राहुल पाटील, अनंत पाटील, नितीन चौधरी तसेच चेतन चौधरी उपस्थित होते.

## वादळामुळे बोगद्यात झाड कोसळले

### मुख्तार खाटीक यांच्या पुढाकाराने रस्ता मोकळा

प्रतिनिधी । अमळनेर



**वादळी वाऱ्यामुळे विप्रो बोगद्यात झाड कोसळल्याने अनेक गावांचा संपर्क तुटून वाहतूक ठप्प झाली होती. मात्र रेल्वे हद्दीतील झाड असल्याने ते हटविण्यास अडचणी येत होत्या.**

दरम्यान, प्रसूतीसाठी दवाखान्यात जाणारी महिला देखील रस्त्यात अडकली होती. घटनेची माहिती मिळताच माजी नगरसेवक मुख्तार खाटीक यांनी घटनास्थळी धाव घेत रेल्वे प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे झाड कापले व रस्ता मोकळा करण्यात आला. यामुळे वाहतूक सुरळीत झाली असून नागरिकांनी माजी नगरसेवक मुख्तार खाटीक यांचे आभार मानले आहेत.

## ग्रामीण रुग्णालय सुरू व्हावे; ७ जूनला मोर्चा

प्रतिनिधी । किनगाव

**येथे परिसरातील नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक कृती समिती, किनगाव यांच्या वतीने रविवार, दि. ७ जून रोजी मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.**

येथे उभारण्यात आलेल्या ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन होऊन जवळपास दोन वर्षांचा कालावधी लोटला असला तरी अद्याप सर्वसामान्य नागरिकांसाठी रुग्णालय सुरू करण्यात आलेले नाही. त्यामुळे परिसरातील हजारो नागरिकांना आरोग्य सुविधांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामीण रुग्णालय तात्काळ सुरू करण्याची मागणी करण्यासाठी लोकशाही मार्गाने शांततापूर्ण मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. सदर मोर्चा रविवार, दि. ७ जून रोजी सायंकाळी ५ वाजता श्रीराम मंदिर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे ग्रामीण रुग्णालय येथे सुमारे २०० हून अधिक नागरिक सहभागी होणार आहेत. यात प्रतिकात्मक रुग्ण (बैलगाडी, ट्रॅक्टरमधून) आणून जनजागृती करण्यात येणार आहे. हा मोर्चा पूर्णपणे शांततापूर्ण व कायद्याच्या चौकटीत पार पाडला जाणार आहे. तरी मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन कृती समितीने केले आहे.

## • निधन वार्ता

### शालिनी निकुंभ

**जळगाव ।** येथील रहिवासी शालिनी तुळशीराम निकुंभ (वय ६९) यांचे बुधवार, दि. ३ जून रोजी सकाळी १०.४० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या तुळशीराम निकुंभ यांच्या पत्नी तर जितेंद्र निकुंभ यांच्या आई होत. त्यांची अंत्ययात्रा दि. ४ रोजी सकाळी ८ वाजता खोटे नगर येथील राहत्या घरापासून निघून नेरी नाका स्मशानभूमीत जाणार आहे.



## राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त काँग्रेस कार्यकर्त्यांचे अभिवादन

प्रतिनिधी । चोपडा

**राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त शहरातील कस्तुरबा माध्यमिक विद्यालयात शहर व तालुकातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी समाजासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण करण्यात येऊन त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प उपस्थित कार्यकर्त्यांनी केला. कार्यक्रमाला काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजीव सोनवणे, शहराध्यक्ष नंदकिशोर सांगोरे, एस. डी. पाटील, नगरसेवक रमाकांत ठाकूर, चोसाका संचालक गोपाल धनगर, शेतकी संघ संचालक देविदास धनगर तसेच अशोक साळुंखे, विलास दारुंटे, व्ही. के. पाटील, युवराज पाटील, रमाकांत सोनवणे, शशिकांत साळुंखे, मनोहर पाटील, दीपक चौधरी, प्रवीण सोनवणे, दीपक विसावे, अकीलभाई आदी काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

## जागतिक सायकलदिनानिमित्त सायकल रॅली

प्रतिनिधी । चोपडा

**महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयातील भूगोलशास्त्र विभाग व पर्यावरण प्रेमी समूह यांच्या माध्यमातून ३ जून रोजी जागतिक सायकल दिनानिमित्त सकाळी ८.३० वाजता शहरात सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले.**



महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे, उपप्राचार्य डॉ. के. एन. सोनवणे, डॉ. ए. बी. सूर्यवंशी, समन्वयक डॉ. शैलेश वाघ, रजिस्टार डी. एम. पाटील व रॅलीत सहभागी होणारे प्राध्यापक व कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. सुरुवातीला या उपक्रमाचे संयोजक डॉ. शैलेश वाघ यांनी जागतिक सायकलदिन साजरा करण्यामागचा हेतू कथन केला. सायकल चालविण्याचे फायदे त्यांनी सर्वांना समजावून सांगितले. सायकल चालविल्यामुळे आरोग्याला फायदा होतोच शिवाय संसाधनांचा मर्यादित वापर, इंधन बचत व प्रदूषणावर उपाय म्हणून सायकल चालविण्याकडे सर्वांनी सकारात्मकतेने पहावे व नेहमी सायकल चालविण्याचा प्रयत्न करावा, असे कथन केले. महाविद्यालयाच्या प्रांगणातून सकाळी ८.३० वाजता प्राचार्य संध्या सोनवणे यांनी हिरवी झेंडी दाखवून सायकल रॅलीचा प्रारंभ झाला. तिरंगा चौक, छ. शिवाजी महाराज चौक, ग्रामीण पोलीस स्टेशन, थाळनेर दरवाजा, महात्मा गांधी चौक, शनी मंदिर, मेन रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गाने शहरात सायकल रॅली काढण्यात आली. रॅलीत जनजागृतीपर घोषणा देऊन नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. प्रस्तुत सायकल रॅलीला महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. संदीप पाटील, सचिव डॉ. स्मिता पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. रॅलीचे यशस्वी आयोजनासाठी प्रा.बी.एम.सपकाळ, डॉ. मुकेश पाटील, चेतन बाविस्कर, डॉ.मोतीराम पावरा, सुधाकर बाविस्कर, भैय्या पारधी, जितेंद्र वाघ यांनी परिश्रम घेतले.

## चोपडा महाविद्यालयाच्या ‘स्मार्ट पेन’ला पेटंट मंजूर

### ‘स्मार्ट पोर्टेबल पेन’ उपकरण; तिघा प्राध्यापकांचे क्रांतिकारी संशोधन

प्रतिनिधी । चोपडा

**येथील डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयातील प्राध्यापकांनी संशोधनाच्या क्षेत्रात पुन्हा एकदा यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील मराठी व हिंदी विभागाच्या प्राध्यापकांनी एकत्रितपणे विकसित केलेल्या स्मार्ट पोर्टेबल पेन फॉर रिअल-टाइम रायटिंग करेक्शन (Smart Portable Pen for Real-Time Writing Correction) या नाविन्यपूर्ण उपकरण डिझाईनला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून अधिकृत मान्यता (पेटंट) मिळाली आहे.**

या महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारी संशोधनात महाविद्यालयातील उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. किशोर एन. सोनवणे, उपप्राचार्य व हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. अनिल बी. सूर्यवंशी आणि मराठी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मधुचंद्र लक्ष्मण भुसारे या प्राध्यापकांचा मोलाचा सहभाग आहे.

डिझाईन उपकरणाची वैशिष्ट्ये आणि या पेनमध्ये मऑप्टिकल कॅरेक्टर रेकग्निशनफ (OCR) मॉड्यूल, मोशन व प्रेशर सेन्सर्स आणि मनॅचरल लँग्वेज प्रोसेसिंगफ(NLP) इंजिन बसवले आहे. वापरकर्ता जसे कागदावर लिहितो, तसे हे पेन मजकुराचे डिजिटल विश्लेषण करते.

**चूक झाल्यास त्वरित इशारा:** लिहिताना स्पेलिंग, व्याकरण किंवा वाक्यरचनेत काही चूक झाल्यास, हे उपकरण पेनमधील व्हायब्रेशन मोटर किंवा एलईडी (LED) इंडिकेटरद्वारे वापरकर्त्याला कोणतीही अडचण न आणता त्वरित अलर्ट (इशारा) देते.

**आधुनिक डिझाइन आणि कनेक्टिव्हिटी:** हुबेहूब सामान्य पेनसारख्या दिसणाऱ्या या उपकरणाला पकडण्यासाठी सोयीस्कर आकार दिला आहे.







### काय आहे हे ‘स्मार्ट पोर्टेबल पेन’ उपकरण?

सध्या डिजिटल साधनांवर (कॉम्प्युटर किंवा मोबाईल) स्पेलिंग आणि व्याकरण दुरुस्त करणारे अनेक सॉफ्टवेअर्स उपलब्ध आहेत. मात्र, कागदावर हाताने लिहिताना (हस्तलेखन) अशी कोणतीही मदत मिळत नाही. हीच अडचण ओळखून या तिन्ही प्राध्यापकांनी कागदावर लिहितानाच तातडीने चुका दुरुस्त करणारे एक स्मार्ट उपकरण (पेन) चे डिझाइन विकसित केले आहे. हे उपकरण विद्यार्थी, भाषा शिकणारे आणि लेखनविषयक दिव्यांगत्व (writing disabilities) असलेल्या व्यक्तींसाठी अत्यंत वरदान ठरणार आहे.

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने प्रतिभा जाधव सन्मानित

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील लोण येथील माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका प्रतिभा जाधव यांना जळगाव येथे रिजनल टीचर्स ऑर्गनायझेशनतर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**



सदर पुरस्कार आमदार सत्यजित तांबे, शिक्षक आ. किशोर दराडे, उद्योजक अशोक जैन या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार वितरण सोहळा जळगाव येथील अल्पबचत भवनात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांतील सक्रिय सहभाग तसेच विद्यार्थी केंद्रित कार्यपद्धती यांची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. प्रतिभा जाधव या साने गुरुजी पतपेढीच्या संचालक असून हिंदी विषयाच्या तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून त्यांनी कार्य केले आहे. तसेच समता शिक्षक परिषदेच्या तालुका अध्यक्षा म्हणून त्या कार्यरत आहेत.